## निवडक महाराष्ट्र

### माझा वेंगुर्ला' तर्फे 'आरोग्यधाम' उपक्रम

**वेंगुर्ला :** विविध सामाजिक उपक्रमात अग्रेसर असलेली 'माझा वेंगुर्ला' ही संस्था आता 'आरोग्यधाम' हा आरोग्य व शिक्षणविषयक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित आहेत. या उपक्रमाचा शुभारंभ शनिवार दि. १७ फेब्रुवारी रोजी उभादांडा-वरचेमाड येथे होणार आहे. शुभारंभाचे औचित्य साधून त्याच दिवसी सकाळी ९ ते २ वाजेपर्यंत सीपीपीए या मुंबईस्थित संस्थेच्या सहयोगाने आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिर घेण्यात येणार आहे. आजच्या धावपळीची जीवनशैली, निकृष्ट आहार आणि व्यायामाचा अभाव आदी कारणांमुळे मनुष्य अनेक दुर्धर आजारांना बळी पडत आहे. अशा आजारांचे वेळीच निदान झाले तर योग्य इलाज होऊ शकतो. यासाठी मुंबईस्थित तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक निमंत्रित करण्यात आले आहे. या शिबिरात रक्त तपासणी, कान, नाक, घसा तपासणी, रक्तदाब व फुफ्फुसाची तपासणी, स्त्रीरोग तपासणी, सर्जिकल आदींची तपासणी केली जाणार आहे.

### गरूडझेप अंतर्गत विविध स्पर्धा

**वेंगुर्ला :** वेंगुर्ला-राऊळवाडा येथील जबरदस्त सांस्कृतिक कला-क्रीडा मंडळातर्फे याहीवर्षी २४ ते २६ फेब्रुवारी कालावधीत 'गरूडझेप महोत्सव २०२४'चे आयोजन करण्यात आले आहे. २४ रोजी सकाळी ९ वा. नायरा पेट्रोलपंप राऊळवाडा येथे रक्तदान शिबिर होणार आहे. याच्या अधिक माहितीसाठी साबाजी राऊळ (९६७३५०७९४४) किवा ज्ञानेश्वर रेडकर (७०५७२७८७२७) यांच्याशी संफ साधावा. सायं. ७ वा. नायरा पेट्रोल पंपानजिक जिल्हास्तरीय रस्सीखेच स्पर्धा आयोजित केली असून यातील प्रथम तीन क्रमांकांना ५ हजार, ३ हजार, २ हजार व आकर्षक चषक देण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी ४०० रू. प्रवेश आहे. दि. २५ फेब्रुवारी सकाळी १० वा. वेंगुर्ला शाळा नं.४, सातेरी मंदिर नजिक, जिल्हास्तरीय चित्रकला व रंगभरण स्पर्धा होणार असून पहिली ते दुसरीसाठी रंगभरण, ३री ते ४थीसाठी 'झाडाखाली बसलेला प्राणी', ५वी ते ७वीसाठी 'आवडता खेळ किवा सण', ८वी ते १०वीसाठी 'समुद्र किनारा स्वच्छता करणारी मुले' आदी विषय ठेवण्यात आले आहे. दि. २६ फेब्रुवारी रोजी सायं. ५ वा. नाचणीच्या पिठापासून पाककला स्पर्धा आयोजित केली आहे.

### भांडारगृहाचे कुलूप तोडून २५४ किलो तांदूळ चोरला

**नांदेड :** शाळेतील भांडारगृहाचे कुलूप तोडून चोरट्यांनी २५४ किलो तांदूळ चोरून नेल्याची घटना देगलूर येथे घडली आहे. यासंबंधी मुख्याध्यापक बल्लीयोदीन अब्दुल हाबमुजावर (५५) यांनी पोलिसांत तक्रार दिली. देगलूर येथील जिल्हा परिषद कन्या शाळा येथे ८ रोजी सायंकाळी ४ ते ९ रोजी सकाळी ९ वाजताच्या दरम्यान, चोरट्याने भंडार गृहाचे कडीकोयंडा तोडून आत प्रवेश केला. आतील पोषण आहाराचे ७ हजार ११० रुपये किमतीचे २५४ किलो तांदूळ चोरून नेला.

### दत्त मंदिरातील दानपेटी फोडून चोरी

**नांदेड :** नांदेडमधील होळी भागात दत्त मंदिरातील दानपेटी फोडून चोरट्यांनी ४ हजारच्या रोकडसह ५ हजार ७५० रुपयांचे साहित्य पळवले. या संबंधी व्यापारी प्रसनजित प्रभुराम डोईफोडे यांनी पोलिसांत तक्रार दिली. होळी येथील दत्त मंदिराची ९ रोजी दुपारी सव्वा तीन वाजता चोरट्यांनी दानपेटी फोडून आतील ४ हजार रुपयांची रोकड व मंदिरातील ५ हजार ७५० रुपयांचे साहित्य असा एकूण ९ हजार ७५० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

# व्हॅलेंटाईनला फुलांचा राजा गुलाब महागणार

**उमेश पठाडे/छत्रपती संभाजीनगर**

प्रेमाचे प्रतीक म्हणून ओळखला जाणारा लाल गुलाब व्हॅलेंटाईन दिनी महागण्याची शक्यता आहे. सध्या १० रुपये प्रतिनग दर असलेल्या या गुलाबपुष्पासाठी प्रेमदिनी १५ रुपये मोजावे लागू शकतात. या दिनानिमित्त गुलाबाची तब्बल आठ ते दहापट आवक होणार असल्याची माहिती ही फुल विक्रेत्यांनी दिली.

व्हॅलेंटाईन डे च्या दिवशी गुलाबच्या फुलाचे वेगळेच नाते असते. व्हॅलेंटाईन डे असल्याने तरुणाईमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. या दिवशी लालेलाल गुलाबांना तरुणाईकडून चांगलीच मागणी असते. वाढत्या मागणीमुळे दरही वाढवले जातात आणि आवकही चार दिवस अगोदर गुलाबाचा दर १० रुपये प्रतिनग होता. मात्र, दोन दिवसापासून तो १५ रुपयांवर जाण्याची शक्यता आहे, अशी माहिती फुलविक्रेते यांनी दै. 'नवशक्ति'शी बोलताना दिली आहे. सध्या २० फुले असलेले दोन-तीन बंडल विक्रीसाठी आणले जातात. परंतु या दिवशी आठ ते दहापट गुलाब विक्रीसाठी आणले जातील, असे हाकम म्हणले. चायनीज गुलाब आणि भारतीय गुलाब असे दोन प्रकारांचे गुलाब असून, या दोन्ही गुलाबांचे दर सारखेच आहेत. टवटवीत, मोठा दिसणारा गुलाब तरुण मंडळी खरेदी करीत असल्याने विक्रेतेही याच गुलाबाकडे आकर्षित होतात. गुलाबांचे बुकेही अनेक जण खरेदी करतात. एरव्ही, हा बुके ६० ते ७० रुपये प्रतिनग मिळतो. परंतु, या दिवशी त्याची किंमत १०० रुपयांपुढे असेल. गुलाबांप्रमाणे विविध गिफ्ट्स खरेदी शनिवारपासून सुरू झाली आहे. सध्या तरुणाई खरेदी करत असल्याची माहीती धूळे या व्यावसायिकांनी दिली. साध्या भेटकार्डपेक्षा सध्या क्रिएटिव्ह भेटकार्ड बाजारात आले आहेत.

### चारुतासागर यांचे साहित्य अमूल्य ठेवा

आप्पासाहेब खोत : १४ वे चारुतासागर साहित्य संमेलन संपन्न



**सांगली :** चारुतासागर यांचे साहित्य हे एक अमूल्य ठेवा असून तोच वारसा नव्या लिहित्या लेखकांनी निरंतर पुढे चालू ठेवणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक आप्पासाहेब खोत यांनी व्यक्त केले. कवठेमहांकाळ येथे संपन्न झालेल्या १४ व्या चारुतासागर साहित्य संमेलनाप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी प्रतिभा पोरे यांना राज्यस्तरीय चारुतासागर उत्कृष्ट कथा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ लेखक प्रा.यशवंत माळी यांचा अमृतमहोत्सव सोहळ्या निमित्त सपत्नीक सत्कार करण्यात आला. आप्पासाहेब खोत म्हणाले, "चारुतासागर यांच्या कथा वाचकाला आजही भुरळ घालतात. त्यांच्या कथा वाचकांच्या मनाला अस्वस्थ करून सोडतात. याचे एकमेव कारण म्हणजे त्यांच्या सर्वच कथा या ग्रामीण भागातील सामान्य माणसांचे वास्तव जीवन अचूक टिपून कथेत जसेच्या तसे सांगतात. त्यांची प्रत्येक कथा ही कसरत व दमदार असल्याने ती अधिक प्रभावी झाली आणि वाचकांच्या अभिरुचीस उतरली. या कथा साहित्याची प्रेरणा घेऊन नव्या लिहित्या लेखकांनी चारुतासागर यांची साहित्य परंपरा पुढे चालू ठेवावी." उद्घाटनपर भाषणात डॉ. जे. डी. म्हेत्रे म्हणाले, "आजच्या युवकांनी मोबाईलच्या आहारी न जाता वाचन, लेखनाचा छंद जोपासावा."

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आजपासून 'स्वराज्य सप्ताह'

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने राज्य, जिल्हा तसेच तालुका स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतनिमित्त 'राज्य रयतेचे-जिजाऊंच्या शिवबाचे' या स्वराज्य सप्ताहाचे आयोजन दि. १२ ते १८ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले आहे. यानिमित्त शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून प्रत्येक शिवप्रेमींनी या स्वराज्य सप्ताहात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अभिजीत देशमुख यांनी केले आहे.



# कृष्णकुमार गोयल यांना जीवनसाधना गौरव पुरस्कार

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा जीवनसाधना गौरव पुरस्कार प्रसिद्ध उद्योजक व दानशूर व्यक्तिमत्त्व कृष्णकुमार गोयल यांना जगद्गुरू श्री श्री रविशंकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विद्यापीठाच्या वर्धापनदिनी जीवनसाधना गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी श्री श्री रविशंकर यांनी संवादातून सामंजस्य प्रस्थापित होते. छोट्या छोट्या गोष्टींमुळे माणसांमध्ये तणाव निर्माण होत असून या संघर्षाला संवाद महत्त्वाचा आहे आणि संवादातूनच सहयोग परावर्तित होऊ शकतो शिक्षणाचा मूळ हेतू संघर्षाला सहयोगात परावर्तित करणे, असे प्रतिपादन केले.

यावेळी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते.


**FLAIR WRITING INDUSTRIES LIMITED**

Regd Off.: 63 B/C, Government Industrial Estate, Charkop, Kandivali West, Mumbai - 400 067, Maharashtra, India.
CIN : U51100MH2016PLC284727

**EXTRACT OF STATEMENT OF UNAUDITED STANDALONE AND CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED DECEMBER 31, 2023**

(₹ in millions except earnings per share)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | | | Consolidated | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended | | | Nine Months Ended | | Year Ended | Quarter Ended | | | Nine Months Ended | | Year Ended |
| | | 31-Dec-23 | 30-Sep-23 | 31-Dec-22 | 31-Dec-23 | 31-Dec-22 | 31-Mar-23 | 31-Dec-23 | 30-Sep-23 | 31-Dec-22 | 31-Dec-23 | 31-Dec-22 | 31-Mar-23 |
| | | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited |
| 1 | Revenue from Operations | 2,151.49 | 2,443.10 | 2,241.62 | 6,899.05 | 6,600.95 | 9,038.72 | 2,249.15 | 2,570.06 | 2,319.22 | 7,286.18 | 6,822.73 | 9,426.60 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period/year (before Tax, Exceptional and/or Extraordinary Items) | 290.15 | 445.38 | 450.44 | 1,151.09 | 1,110.28 | 1,512.54 | 261.18 | 442.45 | 459.12 | 1,133.14 | 1,132.49 | 1,578.11 |
| 3 | Net Profit/(Loss) for the period/year before Tax (after Exceptional and/or Extraordinary Items) | 290.15 | 445.38 | 450.44 | 1,151.09 | 1,110.28 | 1,512.54 | 261.18 | 442.45 | 459.12 | 1,133.14 | 1,132.49 | 1,578.11 |
| 4 | Net Profit/(Loss) for the period/year (after Tax, Exceptional and/or Extraordinary Items) | 214.37 | 333.50 | 329.88 | 857.51 | 819.27 | 1,115.98 | 189.99 | 331.56 | 332.53 | 842.92 | 839.67 | 1,170.39 |
| 5 | Total Comprehensive Income/(Loss) for the period/year [Comprising Profit/(Loss) after Tax, and other comprehensive income (after tax)] | 214.32 | 329.02 | 329.48 | 845.28 | 818.07 | 1,114.38 | 189.93 | 327.07 | 332.13 | 830.69 | 838.47 | 1,168.79 |
| 6 | Equity Share Capital | 526.98 | 466.94 | 466.94 | 526.98 | 466.94 | 466.94 | 526.98 | 466.94 | 466.94 | 526.98 | 466.94 | 466.94 |
| 7 | Other Equity (Excluding Revaluation Reserve) | | | | | | 3,792.84 | | | | | | 3,882.56 |
| 8 | Earning/(Loss) per Equity Share of Rs. 5 each (not annualised for Quarter and Nine Months) Basic (in ₹) | 2.20 | 3.57 | 3.53 | 8.79 | 8.77 | 11.95 | 1.96 | 3.57 | 3.56 | 8.67 | 8.99 | 12.54 |
| | Diluted (in ₹) | 2.20 | 3.57 | 3.53 | 8.79 | 8.77 | 11.95 | 1.96 | 3.57 | 3.56 | 8.67 | 8.99 | 12.54 |

Notes:
1. The financial results have been reviewed by the Audit Committee of Board and Approved by the Board of Directors at its meeting held on February 10, 2024.
2. The above is the extract of detail format of Quarterly and Nine Months Financial Results filed with stock exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of Quarterly financial results are available on the website if the stock exchanges www.nseindia.com and www.bseindia.com and on the Company's website https://www.flairworld.in/investor-relation.html

For FLAIR WRITING INDUSTRIES LIMITED

Sd/-
Vimalchand Jugraj Rathod
Managing Director
DIN- 00123007

Place - Mumbai
Date - February 10, 2024.



**जना स्मॉल फायनान्स बँक**
(शेड्युल्ड कमर्शियल बँक)

नोंदणीकृत कार्यालयः दि फेअरवे, तळ आणि पहिला मजला, सर्व्हे क्र. १०/१, ११/२ आणि १२/२बी, डोमलूर लगत, कोरामंगला इनर रिंग रोड, ईजीएल बिझनेस पार्कच्या पुढे चल्लाघट्टा, बंगलुरू – ५६००७१

शाखा कार्यालयः शॉप क्र. ४ आणि ५, तळ मजला, इंडियाबुल्स मिंट ग्लॅडिस अल्वारेस रोड, हिरानंदानी मेडोज, पोखरण रोड, ठाणे पश्चिम – ४००६१०.

## ई–लिलाव सूचना

सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अँक्ट (सरफैसी अँक्ट) २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) आणि ९ च्या तरतुदींन्वये ई–लिलावामार्फत विक्रीकरिता जाहीर सूचना

निम्नस्वाक्षरीकारांनी **जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड** चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सरफैसी अँक्टच्या कलम १३(४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील मिळकतीचा **कब्जा घेतला** आहे. विशेषतः कर्जदार आणि तमाम जनतेला कळविण्यात येते की, बँकेच्या थकबाकीच्या वसुलीकरिता खालील नमूद खात्यामधील गहाण मिळकतीचा ऑनलाईन लिलाव (ई–लिलाव) हा येथील खालील विहित तारखेस **''जे आहे जेथे आहे तत्त्वाने'' आणि ''जे आहे जसे आहे तत्त्वाने''** करण्यात येईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | मूळ कर्जदार/ सह–कर्जदार/ हमीदारांचे नाव | १३–२ सूचनेची तारीख | कब्जाची तारीख | ०७.०२.२०२४ रोजीस विद्यमान उर्वरित थकबाकी | मिळकतीच्या निरिक्षणाची तारीख आणि वेळ | राखीव किंमत भा. रु. त | इसारा अनामत रक्कम (इअर) भा. रु. त | ई–लिलावाची तारीख आणि वेळ | बोली सादर करण्याची अंतिम तारीख, वेळ आणि ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४५६७८६४००००४२२ ४५६७९६६००००११२ ४५६७९६६०००१००० ४५६७९६६००००६१९ आणि ४५७७०२००००२५६७४१ | १) राधासाई टुटोरिअल्स प्रा. लि. (कर्जदार) द्वारे साईप्रसाद राघव अली, २) सौ. श्रद्धा साईप्रसाद अली (सह–कर्जदार) | २१.०८.२०२३ | १८.१२.२०२३ | रु. ८१,०७,२७०.५७ (रुपये एक्याऐंशी लाख सात हजार दोनशे सत्तर आणि पैसे सत्तावन्न मात्र) | १९.०२.२०२४ स. ०९:३० ते सायं. ०५:०० | रु. ६३,७९,०००/– (रुपये त्रेसष्ट लाख एकोणऐंशी हजार मात्र) | रु. ६,३७,९००/– (रुपये सहा लाख सदतीस हजार नऊशे मात्र) | २८.०२.२०२४ @ स. ११:३० | २७.०२.२०२४ सायं. ०५.३० जना स्मॉल फायनान्स बँक लि., दुकान क्र. ४ आणि ५, तळमजला, इंडियाबुल्स मिंट ग्लॅडिस अल्वारेस रोड, हिरानंदानी मेडोज, पोखरण रोड, ठाणे पश्चिम –४००६१०. |
| | **मिळकतीचे वर्णन/परिशिष्टः** एम जी रोड, गांधी मार्गे व्हिलेज, घाटकोपर किरोल, ता कुर्ला येथे स्थित असलेले आणि वसलेले जमीन धारक सीटीएस क्र. ४५६७ वर बांधलेले पारेख मार्केट प्रिमायसेस को–ऑप हाऊ सोसा लि., घाटकोपर पूर्व, मुंबई ४०००७७ तळमजला, शॉप क्र. १०, मोजमापित क्षेत्र अंदाजे १३५ चौ.फू. चे सर्व ते भाग आणि विभाग आणि सीमाबद्धः पूर्वः सेनापती बापट मार्ग, पश्चिमः निर्वाना को ऑप हाऊ सोसा/ रहिवासीत इमारत, दक्षिणः भागोजी कीर मार्ग, उन्नती इमारत, उत्तरः जनता कॉलनी/ऑर्किड एरिअम इमारत. | | | | | | | | | |
| २ | ४७५९९४२००००१०१ आणि ४७५२९४३००००४१९ | १) श्री. संदेश भिओ येरवनकर २) सौ. गौरी संदेश येरवनकर ३) राजनदान कृष्णा पिंपाटकर | २२.०३.२०२२ | २३.०८.२०२३ | रु. २७,७६,७८०.२८ (रुपये सत्तावीस लाख शह्यात्तर हजार सातशे ऐंशी आणि पैसे अठ्ठावीस मात्र) | १९.०२.२०२४ स. ०९:३० ते सायं. ०५:०० | रु. १६,७१,०००/– (रुपये सोळा लाख एकाहत्तर हजार मात्र) | रु. १,६७,१००/– (रुपये एक लाख सदुसष्ट हजार शंभर मात्र) | २८.०२.२०२४ @ स. ११:३० | २७.०२.२०२४ सायं. ०५.३० जना स्मॉल फायनान्स बँक लि., दुकान क्र. ४ आणि ५, तळमजला, इंडियाबुल्स मिंट ग्लॅडिस अल्वारेस रोड, हिरानंदानी मेडोज, पोखरण रोड, ठाणे पश्चिम –४००६१०. |
| | **मिळकतीचे वर्णन/परिशिष्टः** गाव विरार (पूर्व), तालूका आणि जि. पालघर ४०१३०५ येथे स्थित असलेले आणि वसलेले गावठाण जमीन धारक हाऊस क्र. १५६९/एल३ वर बांधलेले भुज पाडा, मनवेल पाडा रोड, साई बाबा रोड, माऊली अपार्टमेंट क्र. ३ मध्ये पहिल्या मजल्यावर फ्लॅट धारक क्र. १०७, मोजमापित ५१.११ चौरस मीटर्स (बिल्ट अप क्षेत्र) येथे स्थित स्थावर मिळकतीचे सर्व ते भाग आणि विभाग. | | | | | | | | | |
| ३ | ३१६०८९५००००७७४ ३१६०९६७००००१३९ ३१६०९६७००००३४३ | १) जितू पुरुषोत्तम गोकलानी २)चंदार गोकलानी ३) नीतू गोकलानी ४) पायल वाधवा | २८.०७.२०२३ | २३.१२.२०२३ | रु. २६,८१,८०५.२५ (रुपये सव्वीस लाख एक्याऐंशी हजार आठशे पाच आणि पैसे पंचवीस मात्र) | १९.०२.२०२४ स. ०९:३० ते सायं. ०५:०० | रु. २३,८७,०००/– (रुपये तेवीस लाख सत्त्याऐंशी हजार मात्र) | रु. २,३८,७००/– (रुपये दोन लाख अडतीस हजार सातशे मात्र) | २८.०२.२०२४ @ स. ११:३० | २७.०२.२०२४ सायं. ०५.३० जना स्मॉल फायनान्स बँक लि., दुकान क्र. ४ आणि ५, तळमजला, इंडियाबुल्स मिंट ग्लॅडिस अल्वारेस रोड, हिरानंदानी मेडोज, पोखरण रोड, ठाणे पश्चिम –४००६१०. |
| | **मिळकतीचे वर्णन/परिशिष्टः** उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीत सी डी होल्ड अँडिशनल लॅण्ड वाटप केलेले रुम क्र. २ आणि ३ बीके क्र. २०३५, उल्हासनगर ५, ठाणे ४२१००५ वर बांधलेले बीआरके क्र २०३५, शीट क्र. ७५ युएनओ २७७ चा तळमजल्यावर शॉप क्र. ९, मोजमापित अंदाजे ९३ चौरस फूट चे सर्व ते भाग आणि विभाग. पूर्वेलाः कला मंदिर अपार्टमेंटचे शॉप क्र. १०, पश्चिमेलाः कला मंदिर अपार्टमेंटचे शॉप क्र. ०८, दक्षिणेलाः शॉपचा समोर दरवाजा आणि रोड, उत्तरेलाः सदर शॉप क्र. ९ ची मागील बाजू | | | | | | | | | |
| ४ | ३३३९८९५९५९८२२२ ३३३९९६७००००३७ ३३३९९६७००००११३ | १) मे. झेड ए एलिव्हेटर प्रतिनिधीत्व द्वारे प्रोप्रायटर श्री. जमिल अहमद शेख प्रोप्रायटर २) सौ. झरिना जमिल शेख | १०.०२.२०२२ | २६.०८.२०२३ | रु. १६,७५,२९५.०४ (रुपये सोळा लाख पंच्याहत्तर हजार दोनशे पंच्याण्णव आणि पैसे चार मात्र) | १९.०२.२०२४ स. ०९:३० ते सायं. ०५:०० | रु. १०,०७,०००/– (रुपये दहा लाख सात हजार मात्र) | रु. १,००,७००/– (रुपये एक लाख सातशे मात्र) | २८.०२.२०२४ @ स. ११:३० | २७.०२.२०२४ सायं. ०५.३० जना स्मॉल फायनान्स बँक लि., दुकान क्र. ४ आणि ५, तळमजला, इंडियाबुल्स मिंट ग्लॅडिस अल्वारेस रोड, हिरानंदानी मेडोज, पोखरण रोड, ठाणे पश्चिम –४००६१०. |
| | **मिळकतीचे वर्णन/परिशिष्टः** पालघर महानगरपालिका, तालूका आणि जिल्हा, पालघर, पिन ४०१५०४ च्या स्थानिक हद्दीत कलर्स सिटी नावे प्रोजेक्ट मध्ये बोईसर (पश्चिम), जुना सर्व्हे क्र. १००ए, नवीन सर्व्हे क्र. ४४, हिस्सा क्र. ३येथे स्थित ब्लॉक सेक्टर येथे इमारत क्र. ३५ बी, मोजमापित अंदाजे ३४.३४ चौरस मीटर्स, फ्लॅट क्र. ४०१ चे सर्व ते भाग आणि विभाग. | | | | | | | | | |
| ५ | ३३४०९४४००००२५२ | १) हरिश्चंद्र व्होलसेलर अँन्ड रिटेलर शॉप २) हरिश्चंद्र गुप्ता, हरिश्चंद्र व्होलसेलर अँन्ड रिटेलर शॉपचे प्रोप्रायटर, ३) फुलमणी हरिश्चंद्र गुप्ता (हमीदार) | १७.०३.२०२३ | ०८.१२.२०२३ | रु. १२,२५,५१९.०० (रुपये बारा लाख पंचवीस हजार पाचशे एकोणीस मात्र) | २९.०२.२०२४ स. ०९:३० ते सायं. ०५:०० | रु. ६,८३,०००/– (रुपये सहा लाख त्र्याऐंशी हजार मात्र) | रु. ६८,३००/– (रुपये अडुसष्ट हजार तीनशे मात्र) | १५.०३.२०२४ @ स. ११:३० | १४.०३.२०२४ सायं. ०५.३० जना स्मॉल फायनान्स बँक लि., दुकान क्र. ४ आणि ५, तळमजला, इंडियाबुल्स मिंट ग्लॅडिस अल्वारेस रोड, हिरानंदानी मेडोज, पोखरण रोड, ठाणे पश्चिम –४००६१०. |
| | **मिळकतीचे वर्णन/परिशिष्टः** वसई २ येथे उप प्रबंधकच्या क्षेत्रात गाव नारिंगी विरार पूर्व ४०१३०५, तालूका वसई, जिल्हा पालघर येथे स्थित असलेले आणि वसलेले फ्लॅट क्र. ४०४, ४ था मजला, इमारत नाव काईनाथ अपार्टमेंट, बी विंग, जय श्री दुर्गा को–ऑप हाऊसिंग सोसायटी, बँक ऑफ इंडिया मागे, वीर सावरकर मार्ग मोजमापित ३५० चौ.फू. स्थावर मिळकतीचे सर्व ते भाग आणि विभाग. | | | | | | | | | |

मिळकती **''जे आहे जेथे आहे तत्वाने'' आणि ''जे आहे जसे तत्वाने''** विकण्यात येतील. आणि **ई–लिलाव ''ऑनलाईन''** करण्यात येतील. लिलाव वेबपोर्टल **https://bankauctions.in** आणि **www.foreclosureindia.com** येथे बँकेचे मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार **मे. ४ क्लोजर** मार्फत करण्यात येईल. अधिक माहितीकरिता आणि तपशील, मदत, प्रक्रिया आणि ई–लिलावावरील ऑनलाईन प्रशिक्षणाकरिता संभाव्य बोलीदार **मे. ४ क्लोजर; संपर्क श्री. भास्कर नायडू, संपर्क क्रमांकः ८१४२०००८०९/८१४२०००६६१, ईमेल आयडीः info@bankauctions.in / subbarao@bankauctions.in** यांना संपर्क करु शकतात.

ई–लिलाव प्रक्रियेत अटी आणि शर्तीवरील तपशिलाकरिता आणि मिळकतीशी संबंधित कोणत्याही चौकशीकरिता कृपया **जना स्मॉल फायनान्स बँकेचे अधिकारी श्री. कौशिक बग (मोबा क्र.: ७०१९९४९०४०), श्री. दिलशद (मोबा क्र. ८४३३५०८७५९)** यांना संपर्क करावा. प्राधिकृत अधिकाऱ्यांची योग्य माहिती आणि समजुतीप्रमाणे तेथे मिळकतीवर भार नाहीत. तथापी इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मिळकतीचे नामाधिकार, भारांच्या संदर्भात त्यांची स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक आहे. अटी युक्त बोली स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर गहाण मिळकतीचा नियोजित ई–लिलाव करण्याबाबत वरील नावाचे कर्जदार/हमीदार/गहाणवटदार यांना सुध्दा सूचना आहे. कर्जदार/हमीदार/गहाणवटदार यांना लिलावाच्या तारखेपूर्वी वरील नमूद रकमेसह तारखेपर्यंत व्याज आणि अनुषंगिक खर्च चुकता करण्यासाठी याद्वारे सूचित करण्यात येत आहे, कसूर केल्यास मिळकतीचे विक्री करण्यात येईल आणि उर्वरित काहि असल्यास व्याज आणि खर्चासह वसुल करण्यात येईल.

दिनांक : १२.०२.२०२४, ठिकाणः मुंबई — सही/–प्राधिकृत अधिकारी, जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड